MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

6th ANNIVERSARY CELEBRATIONS 2018

# Vidya warta®

Issue-21, Vol-04, Jan. to March 2018
International Multilingual Research Journal

Editor
Dr.Bapu G.Gholap

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

UGC Approved
Jr.No.62759

Jan. To March 2018
Issue-21, Vol-04

Editor
Dr. Bapu g. Gholap
(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ विद्यावार्ता या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायक्षेत्र:बीड

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

14) DEVELOPMENT WITH WOMEN EMPOWERMENT IN INDIA
MEHZABEEN SULTANA , Gauhati University || 72

15) "A COMPARATIVE STUDY OF FINANCIAL ANALYSIS OF THE PIJ ....
Jaydev M. Vithlani, Anand || 77

16) चंद्रपूर जिल्हयातील मोठया व मध्यम उद्योगातील स्थान निर्देशांकाचे ...
डॉ. राजेंद्रकुमार डांगे & प्रा. प्रकाश रामभाऊ रामटेके जिल्हा. चंद्रपूर || 82

17) "आश्रमशाळेत शिकणा-या इयत्ता ८वी तील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक ...
डॉ. आशा म. धारस्कर-भावसार , अकोला || 85

18) लोकसंख्या : जग आणि भारत
प्रा . डॉ . प्रान्जु रा . हिरेखण, यवतमाळ || 91

19) स्त्रियांच्या नव्वदोत्तरी कथेतील सामाजिक पर्यावरण
डॉ. प्रल्हाद होंडे जि. जालना || 95

20) लोकसाहित्यातील इहवाद
प्रा.डॉ.विजय पाटील, जाफ्राबाद || 99

21) संतश्रेष्ठ तुकारामांचे पर्यावरणविषयक विचार
प्रा. डॉ.ममता इंगोले (महल्ले), जि.अकोला || 101

22) सर्वासाठी घरे आणि घरात छोटीशी ग्रंथालये रू एक अभिनव...
प्रा.दिलीप गोविंदा पाटील, जिल्हा— रायगड (महाराष्ट्र) || 107

23) तुकाराम महाराजांच्या अभंगातून व्यक्त होणारे आध्यात्मिक विचार रत्न
डॉ यशोद श्रीमंतराव पाटील , औरंगाबाद || 110

24) 'हिंदी के उपन्यासों में आदिवासी विमर्श'
प्रा.डॉ.डी.एम.टिळेकर, जि.पुणे (महाराष्ट्र) || 112

25) मध्यकालीन संगीत और कला तथा राज्य आश्रय
Sachin Agnihotri ,Shahbad Bhoor,BAREILLY (UP) || 117

26) वर्तमान में सांस्कृतिक मूल्यों के पुर्नस्थापन में विवेकानन्द के व्यवहृत ...
डा० निशा अग्रवाल, मथुरा। || 123

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

निष्कर्ष :

चंद्रपूर जिल्हयातील लोकसंख्येचे गुणोत्तर बघितले असता चंद्रपूर तहसिलमध्ये सर्वात जास्त गुणोत्तर असल्याचे दिसून आले.

चंद्रपूर जिल्हयातील भद्रावती, बल्लारपूर आणि कोरपना तहसिलमध्ये मोठया व मध्यम उद्योगातील गुंतलेल्या कामगारांचे गुणोत्तर जास्त असून त्या तहसिलमधील उद्योगाचे स्थान निर्देशांक जास्त आहे.

चंद्रपूर जिल्हयातील वरोरा, चंद्रपूर आणि मुल तहसिलमध्ये मोठया व मध्यम उद्योगाचा स्थान निर्देशांक मध्यम स्वरुपाचा आहे.

चंद्रपूर जिल्हयातील चिमुर, ब्रम्हपूरी आणि राजुरा तहसिलमध्ये मोठया व मध्यम उद्योगामध्ये गुंतलेल्या कामगारांचे गुणोत्तर कमी असून त्या तहसिल मध्ये मोठया व मध्यम उद्योगाचा स्थान निर्देशांक सर्वात कमी आहे.

चंद्रपूर जिल्हयातील ज्या तहसिलमध्ये मोठया व मध्यम उद्योगाचा स्थान निर्देशांक सर्वात जास्त आहे.

*त्या तहसिलमध्ये मोठया प्रमाणात औद्योगिकी* करण झाले असून जिल्हयातील ओद्योगिक उत्पादनात त्या तहसिलचा वाटा मोठया प्रमाणात आहे.

**संदर्भ सूची :**


१. चौधरी, ए. पी; आणि चौधरी, अ. २०११ औद्योगिक भूगोल . जळगाव : प्रशांत पब्लिकेशन्स.

२. खांडवे, म. अ. १९९७ औद्योगिक भूगोल. पुणे : कॉन्टीनेटल प्रकाशन.

३. केचे, पा. १९९७ महाराष्ट्राचा भूगोल . औरंगाबाद : कैलाश पब्लिकेशन्स.

४. मगर, ज. १९९० आर्थिक भूगोल . नागपूर : विद्या प्रकाशन.

५. खतीब, के. ए. १९९८ भारताचा औद्योगिक भूगोल . पूणे : मेहता पब्लिशिंग हाऊस.

६. Loknathan P. S. (1939).The Industries of Madras. Journal of the Madras Geographical Association ,Vol. 14. No.02.

७. Renner, G. T. (1947). Geography of Industrial Location. Economic Geography ,Vol. 23.

८. Sengupta, P. (1958). Some Aspects of Industrial Growth of Hoogly-Region. The National Geographical Journal of India ,Vol. IV.


**17**

# "आश्रमशाळेत शिकणाज्या इयत्ता ८वी तील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम"- एक अभ्यास


**डॉ. आशा म. धारस्कर-भावसार**

शासकीय अध्यापक महाविद्यालय,

अकोला


**********

स्वातंत्र्यांनंतर शिक्षकाचा प्रवाह तळागाळातील लोकांपर्यंत पोहचला पाहिजे याकरिता शासनाने अनेक योजनपंची अंमलबजावणी केली. शिक्षणाच्या समान संधीसाठी संविधानात तरतूद करण्यात आली आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करण्यात आले. या सर्व बाबींचा हेतू एवढाच की, शिक्षणाची गंगा समजातील तळागाळातील, व्क्तीपर्यंत पोहचवावी. ती पोहचली नाही असे नाही परंतू ती ज्ञानाचा ओलावा निर्माण करू शकली नाही. तळागाळातील समाजामध्ये दुर्गम भागात राहणारा आदिवासी शिक्षणापासून दूर राहिला. शिक्षण आदिवासी समाजापर्यंत पोहोचूनही आदिवासी व्यक्तीची शिक्षणात अपेक्षित प्रगती ाली नाही.

अदिवासी म्हणजे आधीपासूनचा रहिवासी. हा समाज डोंगरदज्यात व दुर्गम भागात वास्तव करतो. त्याचा इतर समाजाशी फारसा संपर्क येत नाही.

शासनाने आदिवासींच्या शिक्षणासाठी खाजगी व शासकीय स्तरावर आश्रमशाळा स्थापन केल्या आहेत. इयत्ता १ली पासून तर १२वी पर्यंतचे शिक्षण त्यांना या आश्रमशाळेत दिले जाते.

स्वातंत्र्यानंतर आजपर्यंतच्या कालखंडात आदिवासींची प्रगती साक्षरतेने मोजल्यास फक्त अकरा टक्के झाली आहे पण केवळ साक्षरता हे शिक्षणाचे मोजमाप होवू शकत नाही.

अदिवासी समाजाच्या शैक्षणिक अधोगतीची अनेक कारणे आहेत. त्यापैकी प्रामुख्याने आर्थिक, सामाजिक व प्राकृतिक कारणे आहेत. त्याचप्रमाणे आदिवासीची बोलीभाषा ही देखील शैक्षणिक प्रगतीतील एक अडचण आहे.

महाराष्ट्र राज्यातील नंदुरबार तालुक्यातील देहवाली भिल्ल समाजाची वस्ती आहे. याशिवाय कोकणी, मावची, पावरा या आदिवासींच्या जाती नंदुरबार तालुक्तया आढळतात. या जातींच्या भिलोरी, कोकणी, मावची व पावरी या बोलीभाषा बोलल्या जातात. या भाषांवर त्या त्या भागात प्रचलीत असलेल्या हिंदी, गुजराती, मराठी, अहिराणी भाषांचा प्रभाव आहे. यापैकी हिंदी व गुजराती भाषेचा सर्वात जास्त प्रभाव दिसून येतो. मात्र त्यामानाने मराठी भाषेचा प्रभाव कमी दिसून येतो. त्यामळे या आदिवासी मुलांना मराठी समजणे व शिकणे बरेच अवघड जाते. याशिवाय शाळेत शिकवले जाणारे सर्व विषय मराठी भाषेतून शिकविले जात असल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना ते समजण्यास कठीण जाते व त्याचा परिणाम त्यांच्या अध्ययनावर अर्थात शैक्षणिक संपादनावर होतो. तेव्हा आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षण घेतांना बोलीभाषेच्या कोणकोणत्या अडचणी निर्माण होतात व या अडचणी सोडविण्यासाठी कोणते उपाय सुचविता येतील यासाठी संशोधकाने प्रस्तुत संशोधनाचा विषय निवडला आहे.

**समस्या विधान :-**

"आश्रमशाळेत शिकणाज्या इयत्ता ८वीतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम एक अभ्यास."

**कार्यात्मक व्याख्या :-**

**१. आश्रमशाळा :**

मागास समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाकरिता शासनाकडून असलेल्या निवासी शाळा.

**२. आदिवासी :**

आदिकाळापासून प्रचलित समाजापासून विभक्त राहून स्वत:च्या संस्कृती व परंपरेनुसार आचरण करणारा आदिम समाज.

**३. बोलीभाषा :**

स्वत:च्या संस्कृतीनुसार रूढ असलेली त्या-त्या समाजाची संपर्क भाषा.

**४. शैक्षणिक संपादन :**

वाढत्या प्रमाणात प्राप्त शिक्षण क्रमानुसार विद्यार्थ्यांच्या अपेक्षित वर्तनावद्दल झालेली बाव.

**समस्येचे महत्व :-**

एकविसाव्या शतकात शिक्षणाची समान संधी सगळयांना उपलब्ध झालेली असतांना या शैक्षणिक स्पर्धेतून मागे राहणे कोणालाही परवडणारे नाही. शिक्षणाशिवाय कोणताही विकास साध्य होत नाही. तेव्हा आदिवासी समाज हा शिक्षणापासून उपेक्षित का रहावा? तो सुध्दा भारतीय समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. स्वातंत्र्य प्राप्तीचा सुवर्ण महोत्सव साजरा करून दशके उलटली तरी महाराष्ट्रासारख्या प्रबगत राज्यातील दुर्गम भागातील आदिवासीच्या शिक्षणाच्या प्रगतीचा आलेख इतर समाजाच्या तुलनेत बराचे मागे आहे.

शासनाने आदिवासीकरिता आर्थिक, सामाजिक विकासासोबत शैक्षणिक विकासाच्याही योजना अंमलात आणल्या. आदिवासी आश्रमशाळा, आदिवासी विद्यार्थी व विद्यार्थिनींकरिता वसतीगृहे, सर्व शिक्षा अभियानाअंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके, उपस्थितीभत्ता, इ. योजनांचा वर्षाव करण्यात आला. योजना भरपूर आहेत ही बाब चांगली आहे. मात्र योजनांची फलनिष्पत्ती किती प्रमाणात होत आहे ही चिंतेची बाब आहे. आदिवासींची कौटुंबिक, भौगोलिक, सामाजिक पारंपारिक परिस्थीती पाहता या योजनांची अंमलबजावणी कमकुवत आहे हे लक्षात येते. घरापासून तर शाळेपर्यंत अनेक समस्यांना तोंड देत आहदिवासी विद्यार्थी शैक्षणिक वाटचाल करीत असतो.

आज आदिवासी जमातीतील विद्यार्थ्यांकरिता राज्यांनी सोयी भारतीय राज्यघटनेतील ४५ वतया कलमानुसार भारतातील अनेक राज्यांनी आपल्या समाजकल्याण व आदिवासी विभागांद्वारे शिक्षणविषयक सोयी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.

महाराष्ट्रात आदिवासींच्या शैक्षणिक प्रगतीकरीता आदिवासी बहुल भागात प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरापर्यंतच्या शासकीय व खाजगी आश्रमशाळा आहेत. या शाळा निवासी असून त्यात मुले व मुली एकत्रित शिक्षण घेतात. पाठयपुस्तके, निवास व भोजन यांची नि:शुल्क सोय केली जाते. उच्च शिक्षणासाठी तालुका व जिल्हा पातळीवर विद्यार्थी व विद्यार्थीनींकरीता स्वतंत्र वसतीगृहे उपलब्ध आहेत.

नंदूरबार तालुका हा डोंगराळ व दज्याखोज्यांनी वेढलेला भरौगोलीक प्रदेश आहे. बज्याचशा अति दुर्गम भागात अजूनही वाहतुकीच्या सोयी उपलब्ध नाहीत तर काही ठिकाणी अतिशय अल्प प्रमाणात वाहतुकीच्या सोयी उपलब्ध आहेत. काही भागात तर पायी प्रवास करावा लागतो. आदिवासी पालकांत अंधश्रध्दा, रूढी, परंपरा यांचा प्रभाव आजही आहे. म्हणून ते पाल्यांच्या शिक्षणाविषयी पूर्णपणे जागृत नसतात.

भौगोलीक परिस्थिती, कोटुंबिक परिस्थिती यावर मात करत आदिवासी विद्यार्थी शाळेत पोहचतो. शाळेत सर्व सोयी सुविधा अभावानेच आढळून येतात. शिक्षकांच्या अध्यापनाची भाषा मराठी असते. सुरूवातीला विद्यार्थी शाळेत येतो तेवढा त्याला फक्त बोलीभाषाच अवगत असते. त्याला अध्यसपनाचे व्यवस्थीत आकलन होत नाही. परिणामी पहिल्या दोन तीन वर्षांत विद्यार्थी लेखन, वाचन, संभाषण या मुलभूत क्रिया समजून घेण्यास मागे पडतो व तो शेवटपर्यंत

शैक्षणिक विकास प्रक्रियेत स्वतःला जुळवून घेण्यास असमर्थ ठरतो. त्यामुळे या अपरिचीत शालेय वातावरणाचा एकूणच आदिवासी विद्यार्थ्यांच्या विकासावर खूप परिणाम होतो.

नंदुरबार तालुक्यातील आश्रमशाळांमधील शिक्षणाचे वास्तव चित्र पाहता संशोधकाच्या मनात या संदर्भात संशोधन प्रकल्प राबविण्याचा विचार आला.

संपूर्ण महाराष्ट्रात मराठी शाळांमध्ये प्रमाणभाषेत शिक्षण दिले जाते. राज्याच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेवून पुस्तकांची पुर्ननिर्मीती होते. त्यात सर्वसाधारण समाजाचाच विचार केला जातो. आदिवासी समाज आदिवासी विद्यार्थी, त्यांची शैक्षणिक प्रगती व अडचणी यांचा विचार होतांना दिसत नाही.

आदिवासी समाजाची बोलीभाषा स्वतंत्र आहे. नंदूरबार तालुक्यातील भिलांची भिलोरी, कोकणी मावची व पावरा-पावरी, या बोलीभाषा आहेत. आदिवासी समाजाच्या बोलीभाषा व प्रमाण भाषा मराठी यांचा कुठलाही संबंध नाही. बालपणापासून विद्यार्थ्यांच्यामनावर स्वतःच्या भाषा तत्वांचा खोलवर परिणाम झालेला असतो.

आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासाकरीता शासनाने आश्रमशाळा ा स्थापन केलेल्या आहेत. वयाच्या सहाव्या वर्षी विद्यार्थी आश्रमशाळेत प्रवेश घेतो. तिथे अध्यापन करणाऱ्या शिक्षकांच्या मराठी भाषेतील उच्चारांचे केवळ श्रवण करतो. त्या शब्दांचा आदिवासी विद्यार्थी अर्थ समजून घेवू शकत नाही. आदिवासी समाजाची बोलीभाषा स्वतंत्र असल्याने आदिवासी व्यक्ती मोठी झाल्यानंतर इतर समाजाच्या संपर्कात येते तेव्हा ती इतर समाजातील व्यक्तीसोबत योग्यप्रकारे संवाद साधू शकत नाही. कारण आदिवासी व्यक्तींची भाषा आणि मराठी भाषा या दोन वेगवेगळया भाषा आहेत. बोलीभाषेचा प्रभाव आदिवासी व्यक्ती व्यवहारात वागतांनाही दिसतो. इतर भाषिक व्यक्तीसोबत संवाद करण्याचा प्रयत्न करीत असतांना आदिवासी व्यक्तीच्या बोलण्यात स्वतःच्या बोलीभाषेतील शब्द ओघाने येतात.

आदिवासी विद्यार्थी वयाने व वर्गाने पुढे पुढे जात असतो. त्या तुलनेत त्यावेळी बोलीभाषेच्या समस्येमुळे त्याची शैक्षणिक प्रगती त्या प्रमाणात वाढत नाही. प्रस्तुत संशोधनातून आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा तयाच्या शैक्षणिक प्रगतीत कोणकोणत्या ठिकाणी अडथळा निर्माण होतो याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधनाची उद्दिष्टे :-

१. इयत्ता ८ वीतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा त्यांच्या शैक्षणिक संपादनावर होणारा परिणाम अभ्यासणे.

२. आदिवासी बोलीभाषा व शैक्षणिक संपादन यांचा सहसंबंध अभ्यासणे.

३. आदिवासी बोलीभाषेमुळे शिक्षणात येणाऱ्या अडचणींचा शोध घेऊन त्यावर उपाय सुचविणे.

**गृहीतके :-**

१. प्रमाणभाषा विकसीत नसल्याने आदिवासी विद्यार्थ्यांना शिकत असलेल्या विषयाचे नीट आकलन होत नाही.

२. बोलीभाषेच्या माध्यमातून शिक्षण उपलब्ध नसल्यामुळे आदिवासी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनावर परिणाम होतो.

**संशोधन परिकल्पना :-**

आदिवासी विद्यार्थ्यांच्या बोलीभाषेचा शैक्षणिक संपादनुकांशी कोणताही सहसंबंध दिसून येत नाही.

**संशोधनाची व्याप्ती व मर्यादा :-**

**व्याप्ती :-**

नंदुरबार शहरातील आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थी ही संशोधनाची व्याप्ती आहे.

**मर्यादा :-**

१. प्रस्तुत संशोधन नंदूरबार शहरापुरते मर्यादीत आहे.

२. प्रस्तुत संशोधनात दोन आश्रमशाळेतील इयत्ता आठवीच्या १०० विद्यार्थ्यांचाच समावेश आहे.

३. प्रस्तुत संशोधन हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादनुकीपूरतेच मर्यादीत आहे.

प्रस्तुत संशोधनात सर्वेक्षण संशोधन पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**सर्वेक्षण पध्दतीच्या निवडीची कारणे :-**

प्रस्तुत संशोधनात आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक संपादन समस्यांचा अभ्यास करावयाचा आहे. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्या सद्यस्थितीशी निगडीत आहेत. सद्यस्थिती जाणून घेण्यासाठी सर्वेक्षण पध्दती अनुकुल असल्यामुळे संशोधनकर्त्याने वर्णनात्मक संशोधन पध्दतीची निवड केली आहे.

**संशोधनाची जनसंख्या :-**

प्रस्तुत सशोधनात नंदूरबार शहरातील सर्व आदिवासी आश्रमशाळा ही जनसंख्या आहे.

**न्यादर्श/नमुना निवड :-**

न्यादर्श निवडीसाठी संभाव्यता पध्दतीमध्ये सुगम यादृच्छिक पध्दतीची निवड करून न्यादर्श निवड करण्याचे ठरविले. लॉटरी पध्दतीने एकूण ४ शाळा निवडल्या या ४ शाळांमधील एकूण १०० विद्यार्थी संख्या न्यादर्श म्हणून ठरविण्यात आली.

**संशोधनाची साधने :-**

प्रस्तूत संशोधनासाठी प्रश्नावली, निरीक्षण या साधनांचा वापर

करण्यात आला.

**माहितीचे संकलन :-**

इयत्ता आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांची सर्व विषयांचा अभ्यासक्रमानुसार आधारीत ४० गुणांची चाचणी घेण्यात आली. विषयानुसार चाचणीतील प्रश्नांचा सारांश निश्चित केला. प्रत्येक विषयावर ५ गुणांचे ५ प्रश्न विचारण्यात आले. मुख्याध्यापकांच्या अनुमतीनुसार ठरलेल्या वेळी त्या त्या शाळेत जावून चाचणी घेण्यात आली. चाचणीचे मुल्यमापन करण्यात आले. मुल्यमापनानंतर चाचणीचे गुणदान करण्यात आले. त्यानंतर विषयानुसार गुणांची टक्केवारी काढण्यात आली. विषयांच्या टक्केवारीनुसार अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात आले.

**अर्थनिर्वचन व माहितीचे सांख्यकीय विश्लेषण :-**

**सारणी क्रमांक-१**

**विषय : मराठी**

| अ.क्र | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १०० | ७२% |
| २ | गैरमराठी | १०६ | ४२.४% |
| | एकूण | ७४ | २९.६% |

**अथनिर्वचन :-**

मराठी बोलीभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत गैरमराठी बोलीभाषा असणारे विद्यार्थी मराठी विषयात २९.६% नी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

बोलीभाषा मराठी नसल्याने मराठी बोलीभाषा नसणाऱ्या विद्यार्थ्यांस मराठी विषय समजण्यास कठीण जातो.

**सारणी क्रमांक-२**

**विषय हिंदी**

| अ.क्र. | विद्यार्थी बोली भाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १४० | ५६% |
| २ | गैरमराठी | १०१ | ४०.४% |
| | एकूण तफावत | ३९ | १५.६% |

**अर्थनिर्वचन :-**

मराठी बोलीभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या तुलनेत गैरमराठी बोलीभाषा असणारे विद्यार्थी हिंदी विषयात १५.६% गुणांनी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

बोलीभाषा मराठी नसल्याने हिंदी विषयातील पाठयांशाचा आशय विद्यार्थ्यांना समजत नाही.

**सारणी क्रमांक-३**

**विषय : इंग्रजी**

| अ.क्र | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १३९ | ५५.६% |
| २ | गैरमराठी | ८८ | ३५.२% |
| | एकूण तफावत | ५१ | २०.४% |

**अर्थनिर्वचन :-**

इंग्रजी विषयात गैरमराठी बोलीभाषा असणारे विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत २०.४% गुणांनी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

गैरमराठी भाषिक विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषेचा अभ्यास करतांना इंग्रजीतील स्पेलींग, शब्दार्थ, व्याकरण, लेखन यातील समस्या आहेत.

**सारणी क्रमांक-४**

**विषय : गणित**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २२० | ८८% |
| २ | गैरमराठी | १३४ | ५३.६% |
| | एकूण तफावत | ०८६ | ३४.४% |

**अर्थनिर्वचन :-**

गणित या विषयात गैरमराठी बोलीभाषा असणारे विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत शेकडा ३४.४% गुणांनी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

गैरमराठी बोलीभाषिक विद्यार्थ्यांना गणितातील लसावि व मसावि यातील लघुत्तम साधारण विभाजक व महत्तम विभाजक हे शब्द समजण्यास अडचणी आहेत. तसेच कोनांमधील फरक व त्यांचे माप हे समजण्यास अडचणी येतात.

**सारणी क्रमांक-५**

**विषय : सामान्य विज्ञान**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २२४ | ८९.६% |
| २ | गैरमराठी | १४४ | ५७.६% |
| | एकूण तफावत | ८० | ३२% |

**अर्थनिर्वचन :-**

विज्ञान विषयात मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत गैरमराठी भाषिक विद्यार्थी ३२% गुणांनी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

गैरमराठी भाषिक विद्यार्थ्यांचे विज्ञान विषयातील एककांबद्दलच्या गणितीय संकल्पना स्पष्ट नाहीत. तसेच वनस्पतीच्या अवयवांच्या नावातील सारखेपणामुळे किंवा भाषेत तेच तेच सारखे शब्द आल्याने गोंधळतात.

**सारणी क्रमांक-६**

**विषय : इतिहास**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | २१० | ८४% |
| २ | गैरमराठी | ८७ | ३४.८% |
| | एकूण तफावत | १२३ | ४९.२% |

**अर्थनिर्वचन :-**

इतिहास विषयात गैरमराठी बोलीभाषा असणारे विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत ४९.२% गुणांनी मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

बोलीभाषा मराठी नसल्याने इतिहास विषयाचे नीट आकलन होत नाही. म्हणून संबंधित विषयाबद्दल गैरमराठी भाषिक आदिवासी विद्यार्थ्यांना गोडी नाही.

**सारणी क्रमांक-७**

**विषय : नागरिकशास्त्र**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १७६ | ७४% |
| २ | गैरमराठी | १०८ | ४३.२% |
| | एकूण तफावत | ०६० | ३०.८% |

**अर्थनिर्वचन :-**

नागरिकशास्त्र विषयात मराठी व गैरमराठी विद्यार्थ्यात ३०.८% गुणांचा फरक आहे.

**निष्कर्ष :-**

बोलीभाषा मराठी नसल्याने नागरिकशास्त्र विषयातील संकल्पना स्पष्ट होत नाही. तसेच संबंधित विषयात विद्यार्थ्यांना गोडी नाही.

**सारणी क्रमांक-८**

**विषय : भूगोल**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १८२ | ७२% |
| २ | गैरमराठी | १०० | ४०% |
| | एकूण तफावत | ८२ | ३२.८% |

**अर्थनिर्वचन :-**

भूगोल विषयात मराठी व गैरमराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या अभ्यासात ३२.८% गुणांचा फरक आहे.

**निष्कर्ष :-**

भूगोल विषयाचा अभ्यास करतांना पृथ्वीच्या गोलावरील अक्षवृत्त व रेखावृत्त संकल्पनांचे नीट आकलन होत नाही. तसेच भूगोलातील नकाशा व गणितीय संकल्पनांचे ज्ञान कमी आहे. भूगोल विषयात गैरमराठी विद्यार्थ्यांना अभ्यासात गोडी नाही.

**सारणी क्रमांक-९**

**विषय : सर्व विषय**

| अ.क्र. | विद्यार्थी बोलीभाषा | प्राप्त गुण | शेकडा गुण |
|---|---|---|---|
| १ | मराठी | १४७१ | ७३.५५% |
| २ | गैरमराठी | ८६८ | ४३.४% |
| | एकूण तफावत | ६०३ | ३०.१५% |

**अर्थनिर्वचन :-**


मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत गैरमराठी भाषिक आदिवासी विद्यार्थी एकंदर विषयातील अभ्यासाच्या संपादणूक पातळीत ३०.१५% गुणाने मागे आहेत.

**निष्कर्ष :-**

गैरमराठी बोलीभाषा असल्याने विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमातील विषय समजण्यास कठीण जातात. त्यामुळे गैरमराठी भाषिक आदिवासी विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत शैक्षणिक संपादणूक पातळीत मागे राहतो.

**आलेख क्रमांक-१**

**मराठी भाषिक विद्यार्थ्यांची विषयवार प्राप्त गुणांची टक्केवारी. संशोधन अभ्यासातून प्राप्त मराठी भाषिक व गैरमराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या संपादणूक पातळीत तफावत दर्शविणारा स्तंभालेख**



चाचणीचे मूल्यमापन करून विषयानुसार मिळालेल्या गुणांची टक्केवारी काढण्यात आली. त्यानुसार त्या त्या विषयातील प्राप्त गुणांचे अर्थनिर्वचन करून निष्कर्ष काढण्यात आले. निष्कर्षासाठी प्रस्तुत संशोधनात करण्यात आलेल्या परिकल्पना दिशादर्शक ठरल्या. चाचणीच्यया विश्लेषणावरून संशोधनासाठी ठेवलेल्या उद्दिष्टांची पूर्तता झाली. सर्व विषयांच्या संपादणूक पातळीत गैरमराठी भाषिक आदिवासी विद्यार्थी मराठी भाषिक आदिवासी विद्यार्थ्यांच्या तुलनेत ३०.९५% गुणांनी मागे आहेत.

**सर्वसामान्य निष्कर्ष :-**

गैरमराठी बोलीभाषा असल्याने विद्यार्थ्यांस अभ्यासक्रमातील विषय समजण्यास कठीण जातात. त्यामुळे गैरमराठी भाषिक आदिवासी विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत शैक्षणिक संपादणूक पातळीत मागे राहतो.

मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषा विषयात गैरमराठी विद्यार्थी मराठी भाषिक विद्यार्थीच्या तुलनेत जास्त प्रमाणात मागे असल्याचे दिसून आले. तर त्यामानाने गणित, विज्ञान हे तांत्रिक विषयात कमी प्रमाणात मागे असल्याचे जाणवले. तर इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल या विषयातही बऱ्याच प्रमाणात मागे राहिल्याचे दिसते. यावरून मराठी भाषिक विद्यार्थ्यांच्या तुलनेत गैरमराठी आदिवासी विद्यार्थी शैक्षणिक संपादणूकीत तुलनेने मागे राहिल्याचे या संशोधनातून दिसून येते.

**शिफारशी/उपाययोजना :-**

**अ) शिक्षकांकरिता शिफारशी :-**

१. आश्रमशाळेतील शिक्षकांनी आदिवासींची बोलीभाषा शिकण्याचा प्रयत्न करावा.

२. प्रमाणभाषेसोबत अध्यापनात आवश्यक ठिकाणी शिक्षकांनी आदिवासी बोलीभाषेचा वापर करून स्पष्टीकरण देण्याचा प्रयत्न करावा.

३. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना विश्वासात घेऊन त्यांच्या समस्या समजून घ्याव्यात.

४. शालेय वेळापत्रकात पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी आदिवासी बोलीभाषा अवगत असणाऱ्या शिक्षकांची नेमणूक करावी.

**आ) पालकांकरिता शिफारशी :-**

१. पाल्यांसोबत वावरतांना बोलीभाषेसह मराठी शब्दांचा देखील वापर करावा.

२. एखाद्या घटकाचे पाल्याला वाचन करावयास सांगून त्याचा त्या घटकाचे बोलीभाषेतून अर्थ स्पष्ट करण्यात सांगावे. पाल्य चुकत असल्यास त्याचा अर्थ स्वत: सांगावा.

३. शाळेत शिक्षकांच्या भेटी घेवून शिक्षकांकडून पाल्याच्या समस्यांवर चर्चा करावी व त्या दुरूस्त करण्याचा प्रयत्न करावा.

**इ) शासनांकरता शिफारशी :/-**

१. आश्रमशाळेतील इयत्ता १ली ते ४थीच्या वर्गांच्या विद्यार्थ्यांना अध्यापन करण्यासाठी आदिवासी बोलीभाषा अवगत असणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करावी.

२.काही विशिष्ट अभ्यासक्रम घटकांचे तज्ज्ञ व्यक्तींकडून आदिवासी भाषेत भाषांतर करून त्या साहित्याचा आश्रमशाळेसाठी पुरवठा करावा.

३. नवीन आश्रमशाळांची स्थापना मराठी भाषिक समाजाचा संपर्क राहील अशा ठिकाणी करण्यात यावी.

४. आश्रमशाळेतील आदिवासी विद्यार्थ्यांच्या भाषिक समस्या लक्षात घेवून त्यांना समजण्यास सोपे जाईल असा वेगळा अभ्याक्रम निश्चित करावा.

**संदर्भग्रंथ सूची :-**


१. भिंताडे वि.रा. (१९९४),'शैक्षणिक संशोधन पद्धती : नूतन प्रकाशन, पुणे.

२. घोरमोडे के.यु. व घोरमोडे कला (२००८) 'शैक्षणिक संशोधनाची मूलतत्वे, विद्या प्रकाशन, नागपूर.

३. कदम चा.प. (२००७) शैक्षणिक संख्याशास्त्र नित्य नूतन प्रकाशन, पुणे.

४. जोशी अनंत, महाले संजीवनी, (१९९९) संशोधन मार्गदर्शक मौलिक पुष्प १ ते १५, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.


**नियतकालिके :-**


१. जीवन शिक्षण, केंद्रशाळा विशेषांक (डिसेंबर २००१) पुणे महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.

२. जीवन शिक्षण केंद्रशाळा विशेषांक (एप्रिल २००८), पुणे. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद.


❑❑❑